# निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग

* प्रा. ज्योती नाडे ** श्री. बापूसाहेब देशमुख

समाज व समाजाचे स्वरूप लक्षात घेता महिला ही मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे असे असले तरी महिलासाठी फार काही करण्यात आलेले नाही. विशेषतः भारतीय महिलांचा विचार करता अनेक दिवसांपासून भारतीय महिला ही पारंवलबित्वाचे व दुय्यम जीवन जगत आलेली आहे. शतकानुशतके ती अनेक प्रकारच्या हक्कांपासून वंचित राहात आली आहे. स्त्रियांच राजकीय सहभागाचा विचार करता, भारतातील विविध प्रकारची संस्कृती, रुढी, परंपरा व प्रथा यांचा स्त्रियांच्या राजकीय सहभागावर प्रभाव पडत आला आहे. वैदिक काळात पुरूषाच्या मानाने स्त्रिला दुय्यम समजले जात. त्यामुळे तिचा राजकीय सहभाग नव्हता. बौद्ध काळ व जैन काळात देखील स्त्रियांचा राजकीय सहभाग फारच कमी प्रमाणात दिसून येतो. मौर्य व गुप्तांच्या काळात देखील स्त्रियांचा राजकारणात, निर्णयप्रक्रियेत फारसा सहभाग नव्हता. याच काळात दुस-या चंद्रगुप्ताची मुलगी राणी प्रभावतीने वाकाटकाच्या राज्यावर राज्य केले. धार्मीकदृष्ट्या अतिशय कट्टर समजल्या जाणा-या मोगल काळामध्ये मात्र अनेक स्त्रियांनी राज्यकारभार केला. जसे गुलबदन बेगम, जहाँआरा रजिया सुलतान, नूरजहाँ, हजरत महल, चाँदविवी इ.

मराठा काळामध्ये विशेषतः १७ व्या १८ व्या शतकात जिजाबाई राजकीयदृष्ट्या निर्णयप्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर जागृत होत्या. याच काळात ताराबाई या देखील अतिशय प्रबळ होत्या. राणी लक्ष्मीबाई यांनी देखील फार मोठ्या प्रमाणात ब्रिटीशांना विरोध करून १८५७ मध्ये आपली राजकीय व प्रशासकीय चुणूक दाखविली. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरू झाला. ज्या भारतीय समाजामध्ये वर्षानुवर्षे स्त्री ही अनेक दृष्टीने उपेक्षित होती तिचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने स्वातंत्र्यापर्यंत राजकीय पातळीवर फारसे प्रयत्न झाले नाहीत व स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेतही स्त्रियांच्या विकासाच्या दृष्टीने विशेषतः स्त्रियांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने व्यापक तरतुदी करण्यात आल्या नाहीत. १९५२ ते १९९२ पर्यंत राष्ट्रीय स्तरावर व महाराष्ट्रामध्ये पंचायतराज संस्थाचे मूल्यमापन करण्यासाठी ज्या विविध समित्यांची स्थापना आली त्यापैकी फक्त पी. बी. पाटील समितीने महिलांसाठी २५% जागा राखीव ठेवाव्यात असे सुचवले. स्त्रियांचा राजकारणातील सहभाग वाढावा स्त्रियांच्या प्रश्नावर काम करण्याची संधी त्यांना मिळावी, गावाचा पर्यायाने समाजाचा सर्वांगीण तथा समतोल-संतुलीत विकास व्हावा या हेतूने आता स्थानिक स्वराज्य संस्थातील ३३% पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

आरक्षणपूर्व काळात महाराष्ट्रामध्ये पंचायतराज व्यवस्थेत दोन प्रतिनिधी महिलांसाठी तरतुद करण्यात आली होती. या पदासाठी उमेदवार न मिळाल्यास नेमणूक करण्याची सोय ही त्यामध्ये होती. परंतु त्या जागी महिलांची नेमणूक ब-याचदा न झाल्याचे दिसते. तसेच गावपातळीवर पुरूष अथवा स्त्रियांनीही या तरतुदीला गंभीरपणे घेतलेले नव्हते. उलट ज्या महिला जास्त पुढाकार घेणार नाहीत "ढवळाढवळ" करणार नाहीत अशाच महिलांना निवडलं जायच, एकूणच मूक आणि कोणताच परिणाम करण्याची क्षमता नसलेला हा सहभाग होता. या सर्व पार्श्वभूमीवर राजकीय निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा या हेतूने स्था. स्व. संस्थेत ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे ३३% आरक्षण करण्यात आले आहे. स्त्री प्रश्नांना राजकीय चौकटीत मान्यता देणारे पाऊल महत्त्वपूर्ण आहे. त्याचबरोबर याची अंमलबजावणी व सामाजिक प्रभाव पाहणे हे ही महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने लातूर तालुक्यातील ग्रामपंचायत महिला सदस्यांचा अभ्यास केला आहे.

**अभ्यासाचे क्षेत्र** :-निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग हा अभ्यासाचा विषय आहे. या विषयाला अनुसरूनच सखोल माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने व अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अभ्यासासाठी लातूर तालुक्याची निवड केली आहे. महाराष्ट्रातील एकूण ३३ ग्रामीण जिल्ह्यांपैकी व मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांतील लातूर हा प्रमुख जिल्हा आहे. वर्तमान लातूर जिल्हा १८५३ साली निजाम संस्थानाने निर्माण केलेल्या उस्मानाबाद जिल्ह्याचाच एक भाग होता. प्रशासन व जनतेच्या सोयीसाठी १६ ऑगस्ट १९८२ साली उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. सध्या जिल्ह्यात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, रेणापूर, चाकूर, देवणी, जळकोट व शिरूर अनंतपाळ असे दहा तालुके आहेत.

**लातूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था**

| अ.क्र. | संस्था | संख्या |
|---|---|---|
| १ | जि. प. | १ |
| २ | पंचायत समिती | १० |
| ३ | ग्रा. पं. | ७८२ |

**अभ्यासाची उदिष्ट्ये** :-१. स्त्रियांचे प्रश्न व दृष्टीकोन यसांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळावे असा हेतू स्त्रियांच्या आरक्षणामागे आहे. राजकीय प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी राजकारणाबाबत जागरूकता असणे जरूरीचे आहे. या दृष्टीने परिणामकारक ठरणारी माहिती महिलांपर्यंत का, कशी व कोणत्या माध्यमातून पोहचते. २. ग्रामपंचायत यंत्रणा, कार्यपद्धती व योजना याबाबत स्त्रियांचे आकलन. ३. स्त्रियांच्या राजकीय सहभागाकडे त्या कशा पाहतात. त्या स्वतः राजकारणात किती सक्रिय आहेत, याचा अभ्यास करणे.

**गृहितके** :-१. ग्रामपंचायतीच्या बैठकीस महिला सदस्याची नाममात्र उपस्थिती असते. २.निर्णय प्रक्रियेत महिला आपला प्रभाव टाकू शकत नाहीत. ३. प्रशिक्षणाअभावी महिला निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकू शकत नाहीत.

**नमुना निवड**:-प्रस्तुत अध्ययनाचा हेतू सूक्ष्म व गहन अभ्यास आहे. त्यामुळे पंचायतराज व्यवस्थेतील तिस-या स्तरातील म्हणजे लातूर तालुक्यातील ग्रामपंचायतीतील निर्वाचीत महिला सदस्यांचा समावेश केला आहे.

**नमुना निवड प्रक्रिया**:-प्रस्तुत अध्ययन सर्वेक्षण पद्धतीवर आधारलेले आहे, संशोधनाच्या क्षेत्रात १०८ ग्रामपंचायती आहेत. त्यातील क्षेत्र विशाल असल्या कारणाने प्रत्येक ग्रामपंचायतीतील महिला सदस्यांचे अध्ययन

* मोदी नगर, मुरूड, लातुर,

करणे संभव नाही. त्यामुळे एकूण १०८ ग्रामपंचायतीमधून २०% ग्रामपंचायतीची निवड साधा या दृच्छिक नमुना पद्धतीच्या आधारावर लॉटरी पद्धतीने केली आहे. २१ ग्रामपंचायतीमधून प्रत्येकी २ महिला प्रतिनिधींचा समावेश केला आहे.

**लातूर तालुक्यातील पंचायतराज व्यवस्था**

| संस्था | संस्थांची संख्या | पु. सदस्य | म. सदस्य | एकूण सदस्य |
|---|---|---|---|---|
| जि. प. | १ | ०६ | ०३ | ०९ |
| पं. स. | १ | १२ | ०६ | १८ |
| ग्रा. पं. | १०८ | ५९८ | २७२ | ८७० |

**तथ्य संकलन** :-प्रस्तुत अध्ययनाचा हेतू लातूर तालुक्यातील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग विशेषतः ग्रामपंचायत महिला सदस्य यावर आधारलेला आहे. शोधकार्याची अध्ययन संरचना प्राथमिक व द्वितीयक स्त्रोताचा समग्र विश्लेषणावर आधारलेली आहे. १. प्राथमिक स्त्रोत - महिला सदस्यांच्या विविध बाबीची माहिती जाणून घेण्यासाठी प्रश्नावली तयार करून आवश्यक ती माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. २. द्वितीयक स्त्रोत - विविध संदर्भ ग्रंथ, लातूर जि. प. द्वारा प्रकाशित साहित्य, वार्षिक अहवाल, यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रकाशित अनेक पुस्तके, शोध अध्ययन सामग्री.

**राजकीय जागरूकता व आकलन** :-कोणत्याही गोष्टीची माहिती होणे, ती संपादीत करणे ही जागृतीची पहिली पायरी. त्यादृष्टीने विविध स्वरूपाची माहिती ग्रामपंचायत महिला सदस्यापर्यंत पोहचते का? कशी पोहचते या दृष्टीने प्रश्न विचारण्यात आले होते. त्यामध्ये भारतातील राजकीय घडामोडी, स्त्रियांचे प्रश्न व इतर स्वरूपाची माहिती महिलांपर्यंत पोहोचण्याचे माध्यम कोणते हे जाणून घेण्याचा उद्देश होता. तालुक्यातील ६५% महिला सदस्यांनी वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ इ. पैकी एकाच्या माध्यमातून माहिती मिळते असे सांगितले म्हणजे काम करताना पुरेशी माहिती मिळते अथवा मिळवण्याचे मार्ग आहेत हे त्यांच्या प्रतिसादावरून जाणवले. काही महिला सदस्यांनी मात्र त्यांना या प्रकारची माहिती मिळत नसल्याचे सांगितले. दैनंदिन आयुष्यात या माहितीचा काय उपयोग हीच त्यांची भावना होती. माहिती नसणं अथवा ती मिळवण्याची उत्सुकता नसणं याचा नकारात्मक परिणाम राजकीय सहभागावर होतो. सर्वसाधारण राजकीय माहिती बरोबरच पंचायतराज व्यवस्थेची माहिती या महिलांना कितपत आहे हे जाणून घेताना वरीलप्रमाणेच प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील ६२.४० महिलांना सर्वसाधारण स्वरूपाची होती. २९.०५% महिला सदस्यांना पंचायतीचा निधी, योजना याबाबत अज्ञानी होत्या, तर काहीजणींनी स्थानिक कामकाज, महिलांचे आरक्षण याबाबत कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त करण्यास असमर्थता दर्शवली. शिक्षणाचे प्रमाण, सामाजिक चळवळीचे वातावरण यांच्या अभावामुळे येथील महिलांना त्यांच्या कामाच्या स्वरूपाचे, क्षमतेचे भान अद्याप आलेले नाही. त्याची सुरूवात होणे किती महत्वाचे आहे, हे जाणवते. महिलांच्या राजकीय सहभागाला प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांचा राजकारणाबद्दलचा दृष्टीकोन सकारात्मक असणे जरूरीचे आहे. सद्यस्थितीतील राजकारण महिलांना राजकीय सहभागी होऊ देण्यास अडचणी निर्माण करत असेल तर ते ओळखण्याची कुवत व बदलण्याची ताकद महिलांनी प्राप्त करणे जरूरीचे आहे. अर्थात या दुरगामी अपेक्षा करताना स्त्रियांना राजकारण म्हणजे काय व त्यात स्त्रियांचे स्थान कोणते वाटते हे जाणून घेणे महत्वाचे वाटले, त्याबाबत पुढील प्रतिक्रिया आल्या.

- गावाचा विकास म्हणजे राजकारण. -समाज सुधारण्यासाठी मनःपूर्वक केलेले प्रयत्न, काम म्हणजे राजकारण. -राजकारण म्हणजे भ्रष्टाचार.- राजकारण म्हणजे मला काहीही माहित नाही आणि ते माहिती करून घेण्याची जरूरीही वाटत नाही. -राजकारण म्हणजे काय माहिती नाही. आमच्या गावात सरपंचाच्या हातातच सर्व सत्ता आहे तो आम्हाला काहीही माहिती देत नाही.

**या विषयासंबंधी महिला सदस्यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया बोलक्या व वास्तववादी दिसून येतात.**

राजकारणातील स्त्रियांचे स्थान काय आहे यावर प्रतिक्रिया विचारल्या असता खालील प्रतिक्रिया मिळाल्या. - स्त्रियांना स्वतः निर्णय घेण्याची संधी हवी. - स्त्रिया राजकारणात खरोखरच सहभागी होतील तर त्यांना कोणतीही आडकाठी नसेल. - स्त्रियांनी राजकीय कामात सक्रीय सहभागी झालं पाहिजे. - सगळ्याच राजकीय कार्यक्रमात स्त्रियांची जरूरी असते. पण समान वागणूक दिली गेली पाहिजे. - स्त्रियांच राजकीय काम दुर्लक्षित राहात. कारण त्या वरचढ आवाजात बोलत नाहीत. गावाचा कारभार पुरूषांपेक्षा स्त्रिया अधिक चांगल्या प्रकारे बघतील अस वाटतं? यावर खालील प्रतिक्रिया आल्या. - स्त्रिया व्यसनी नसतात. - आपल्या गावाच्या, वस्तीच्या प्रश्नांविषयी महिलांना अधिक कळकळ असते. - एखादी गोष्ट चांगलीच व्हावी अशी स्त्रियांची इच्छा असते. - जर महिला घर सांभाळू शकतात, तर गाव का नाही सांभाळू शकणार. - जर निर्णय घेणारी पुढारी स्त्री असेल तर गावची कोणती पण महिला तिच्याशी मोकळेपणाने बोलू शकते. - पुढारीपणाचे गुण स्त्रियांच्यात नसतात त्यांनी राजकारणात येऊ च नये. या उत्स्फूर्त उत्तरातून राजकारण, स्त्री प्रश्न याबाबतची विचारपूर्वक प्रतिक्रिया जरी आली नसली तरी काही वेळा उदासीनता, नकार तर काही वेळा उत्साहाने महिलांनी मते नोंदविली आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत सदस्या या नात्याने महिला राजकारणात कशा आल्या, बैठकींना त्या कशा हजर राहतात, त्या इतर राजकीय संस्थांशी जोडल्या आहेत का याची माहिती घेतली. गावात सर्वसाधारण या महिलांचा संपर्क कसा आहे, सामाजिक कामात त्यांचा यापूर्वी समावेश होता का, आता आहे का व कसा याबाबतच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. तालुक्यातील ६ महिला स्वतःच्या इच्छेने या निवडणुकीत उतरल्या. ४ महिला ग्रामपंचायत सदस्यामुळे व ९ महिला सदस्या कुटुंबीय व इतर ग्रामस्थांच्या आग्रहाने तयार झाल्या. फक्त २ महिला सदस्या केवळ आपण पुन्हा याच स्वरूपाचे काम करू असे म्हटले तर इतरांना या कामात स्वारस्य नव्हते. १० महिलांचे पती अथवा इतर कुटुंबीय बैठकांना हजर राहतात. ८ महिला सदस्या नियमित बैठकीला उपस्थित राहतातव बोलायला सांगितले तरच बोलतात. बैठकीत वादावादी होते म्हणून ९ महिला थोडा वेळ हजर राहून निघून येतात. प्रत्यक्ष कामकाजात कमी सहभाग व पुरूषांकडून ऐकावे लागणारे टोमणे यातून महिलांची या कामाची इच्छाशक्ती विकसितच होत नाही. काही महिलांनी म्हटले की, कामाची जास्त माहिती घेणे त्यांना आवडेल पण कुटुंबीयांना पटणार नाही. कुटुंबीयांच्या म्हणण्याबाहेर महिलांनी काही काम केले तर त्यांच सहकार्य मिळणार नाही. अशी भितीही काहींनी व्यक्त केली. महिलांनी सामाजिक काम करावे पण राजकारण हा महिलांचा प्रांत नव्हे ही समाजाची मानसिकता हा महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभागाला मोठा अडसर आहे. राजकारणातील भ्रष्टाचार, सत्तेतील पुरूषांची अरेरावी याला अलिखीत मान्यता असल्यानेही महिला पुढे यायला घाबरतात. ज्या ठिकाणी महिला सामाजिक संघटनाशी जोडल्या आहेत स्त्री प्रश्नाशी नाते जोडून समविचारी स्त्रियांचा समूह पर्यायी दबाव गट म्हणून तयार झालेला आहे तेथेच राजकारणातील स्त्रियांच्या सहभागाला तीव्र प्रतिक्रिया येत नाहीत, हे ही या बोलण्यातून पुढे येत होते.

**निष्कर्ष** :- निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग ग्रामपंचायत महिला सदस्य यांच्या अभ्यासावरून निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत ते म्हणजे माहिती

ही सत्ता आहे, ही सत्ता स्त्रियांनी आत्मसात केली पाहिजे. महिला जोपर्यंत जागरूक होत नाहीत तोपर्यंत ३३% आरक्षणाची तरतुद व उदिष्ट दोन्ही कागदावरच राहणार, हे कटू वास्तव आहे. पण एवढे म्हणून हात झटकून मोकळे होता येणार नाही. ज्या सामाजिक रचनेत स्त्रिया घडतात, जी मूल्ये प्रस्थापित आहेत, ती बदलल्याशिवाय स्त्रियांचा सक्रिय सहभागाचा मार्ग खुला होणार नाही. या अभ्यासावरून असे लक्षात येते की, विविध पातळ्यावर हस्तक्षेप, प्रशिक्षण, मार्गदर्शन बदल अशा जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज आहे. महिला सदस्यांमध्ये राजकीय जागृतीची, प्रशिक्षणाची जशी जरूरी आहे त्याचप्रमाणे गावात इतर महिलातही विचार सुरू होणे गरजेचे आहे. स्त्रियांना त्यांचे राजकीय स्थान व त्यातील ताकद पुरेपूर अंमलात येण्यासाठी पुढील ३ मुद्द्यांचा प्रशिक्षणात समावेश असावा. १. राजकीय यंत्रणा, प्रक्रिया व सामाजिक राजकीय प्रश्न. २. स्त्री प्रश्न ३. गावातील प्रश्न या प्रशिक्षणातून महिलांच्या स्वयंसिद्धतेची प्रक्रिया सुरू होण्यासाठी महिलांची या कामातील गुंतवणूक वाढणे, स्त्री प्रश्न, गावातील विकास, राजकीय स्थान यांचा परस्परसंबंध ओळखून कृतीशील होण्याची इच्छा जागृत होणे हा प्रशिक्षणाचा पाया असला पाहिजे. महिलांच्या या कामाला मान्यता देण्यासाठी, स्विकारण्यासाठी गावातील स्त्री-पुरूषांची मानसिकता बदलण्याचीही जरूरी आहे. गावात कार्यरत विविध सामाजिक संघटनांनी परस्पर समन्वयाने स्त्रियांच्या राजकीय सहभागाचा प्रश्न उपलून धरला तरी अधिक प्रभावीपणे काम होईल. आरक्षणाची तरतुदीतून महिलांना राजकारणात सक्रीय होण्यासाठी सामाजिक संघटनाचे पाठबळ, प्रशिक्षण, मार्गदर्शन जरूरीचे आहे. यासाठी राज्य, जिल्हा व गावपातळीवर एक व्यासपीठ निर्माण होण्याची जरूरी आहे. राज्यशासनाचे सहकार्य व मान्यता या व्यासपीठास मिळवून महिलांच्या राजकीय सहभाग प्रक्रियेला वेग आणण्यासाठी समन्वय यंत्रणा उभी करता येईल.

महिलांना राजकारणात येणा-या अडचणी हा सार्वत्रिक प्रश्न आहे. निर्णयाची प्रक्रिया कुटुंबापासून सुरू होते. आज कुटुंबात स्त्रियांना स्वतंत्रपणे मत मांडण्याची सवय लावली आहे का? उलट पुरूष प्रधान संस्कारांनी आहे ते स्विकारण्याची सवयच स्त्रियांना असते. घरातील हे चित्रच घराबाहेर ग्रामपंचायतीत वा इतर ठिकाणी उमटणार त्यामुळे महिलांना त्यांच्या सामाजिक स्थानाबद्दल अधिकाराबाबत जागृत करावे लागणार आत्मसन्मान जागवावा लागणार. या प्रक्रियेत केवळ माहिती देऊन चालणार नाही, तर माहिती मिळवण्याची इच्छाशक्ती तयार करायला लागणार. अनेक महिलांनी गावाचा विकास योजनांतही रस दाखवला. केवळ स्त्री प्रश्नच नव्हे तर गावाचे प्रश्नही महिला बोलतात हे ही महत्वाचे आहे. आरक्षणाच्या तरतुदीने स्त्रियांच्या राजकीय सहभागाला वाट करून दिली आहे. आता यापुढील पाऊल म्हणजे या संख्यात्मक सहभागाला सक्रीय करून सत्तेतील असमतोल नाहीसा करणे. कुटुंब, गाव व देशाच्या राजकारणात स्त्रियांनी ख-या अर्थाने सहभागी होण्यासाठी, स्त्रियांचे ख-या अर्थाने सहभागी होण्यासाठी, स्त्रियांचे म्हणणे प्रभावी होण्यासाठी आत्मभान व संघटन वाढविणे जरूरीचे आहे.

## सन्दर्भ-


1. Hejel D. Lima - Women in local Govt. - A study of Maharashtra Cocept Publication Co. New Delhi, 1983. Page 39
2. Chavan R. L. - Panchayat Raj System and Women Approach Yashda, Pune Page - 2
3. Maharashtra - District - Latur Information and Public Relation Directorate 1988. Page - 4,5
4. Kothari C. R. - Research Methodology Wishva Publications, New Delhi, 1995. Page - 2/4
5. Rohini Gavankar - Maratha Sthree Shiakiche Rajkarni Roop. Aditya Prakashan, Pune, 1986. Page - 173 - 175
6. Women Supporting Center - 1995. A Study of Women in Panchayat Raj Institutions in Pune, Latur and Osmanabad District.